Samna - 20/11/2011 Maharashtra Times - 22/11/2011

महाराष्ट्र शासन

नागरी संरक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई - ४०० ०३२.

दूरध्वनी क्र. ०२२-२२८४३६६७ फॅक्स क्र. ०२२-२२८५६४३५

खुल्या व मागासवर्गीयांसाठी आरक्षित प्रवर्गातील तांत्रिक/अतांत्रिक गट क व ड ची पदे भरण्याबाबत

: जाहिरात :

नागरी संरक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवरील व अधिपत्याखालील असलेल्या कार्यालयातील गट क व ड ची रिक्त पदे [illegible]ण्याकरिता खुल्या व मागासवर्गीय प्रवर्गातील सरळ सेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात **महाराष्ट्र ज्ञान मंडळ मर्यादित, पुणे (म.के.सी.एल.)** या शासनमान्य संस्थेमार्फत अर्ज मागविण्यात येत आहेत. **प्रत्येक पदाकरिता स्वतंत्र अर्ज करावा.**

यापूर्वी प्रसिद्धी करण्यात आलेल्या डिसेंबर २००७ व जानेवारी २०१० मधील जाहिराती रद्द करण्यात येत आहेत.

क्र.		प्रवर्गनिहाय पदे								
	एकूण पदे	अजा	अज	विजा(अ)	भज(ब)	भज (क)	भज (ड)	इमाव	विमाप्र	खुला
	सहाय्यक उपनियंत्रक (वे.श्रे. रु. १३००-३४८००) ग्रेड वेतन - ४२००/-									
	२८ (१ खेळाडू-साठी)	१	-	१	-	१	-	२ (१महिला साठी)	२ (१महिला साठी)	२१ (अंशकालीन कर्मचाऱ्यांसाठी, २ महिलांसाठी, २ अपंगांसाठी १ क्षीण दृष्टी,१ श्रवणशक्ती दोष), २ खेळाडूंसाठी)
	तांत्रिक सहाय्यक श्रेणी -१ (ऑटोमोबाईल) (वे.श्रे. रु.१३००-३४८००) ग्रेड वेतन - ४३००/-									
	१	१	-	-	-	-	-	-	-	-
	उपनियंत्रण अधिकारी (गट - क) (वे.श्रे. रु.५२००-२०२००) ग्रेड वेतन - २८००/-									
	१	-	१	-	-	-	-	-	-	-
	मिश्रक / औषध निर्माता (वे.श्रे. रु.५२००-२०२००) ग्रेड वेतन - २८००/-									
	१	१	-	-	-	-	-	-	-	-
	तांत्रिक सहाय्यक श्रेणी - २ (वायरलेस) (वे.श्रे. रु.५२००-२०२००) ग्रेड वेतन - २४००/-									
	१	१	-	-	-	-	-	-	-	-
	रेडिओ विनतारी यांत्रिक (वे.श्रे. रु.५२००-२०२००) ग्रेड वेतन - २४००/-									
	१	१	-	-	-	-	-	-	-	-
	स्वयंचीजतंत्री (वे.श्रे. रु.५२००-२०२००) ग्रेड वेतन - २४००/-									
	१	१	-	-	-	-	-	-	-	-
	दूरध्वनीचालक (वे.श्रे. रु.५२००-२०२००) ग्रेड वेतन - १९००/-									
	२	१	-	-	-	-	-	-	-	१ (१ अपंगासाठी अंधत्व किंवा क्षीणदृष्टी)
	सहाय्यक जोडारी यांत्रिक (वे.श्रे. रु.५२००-२०२००) ग्रेड वेतन - २०००/-									
	१	१	-	-	-	-	-	-	-	-
	वाहनचालक (वे.श्रे. रु.५२००-२०२००) ग्रेड वेतन - १९००/-									
	२	-	१	-	-	-	-	-	-	१
	अग्निशामक / विमोचक (वे.श्रे. रु.५२००-२०२००) ग्रेड वेतन - १९००/-									
	४२	३ (१प्रकल्पग्रस्त/ भूकंपग्रस्तां-साठी)	-	१	१	२ (१प्रकल्पग्रस्त/ भूकंपग्रस्तां-साठी)	१	६ (१ माजी सैनिक, १ खेळाडू साठी	-	२८ (२ प्रकल्पग्रस्त/ भूकंपग्रस्त, २ माजी सैनिक, १ खेळाडूसाठी)
	प्रथमोपचारक (वे.श्रे. रु.५२००-२०२००) ग्रेड वेतन - १९००/-									
	१	१	-	-	-	-	-	-	-	-
	शिपाई / संदेशवाहक (वे.श्रे. रु.४४४०-७४४०) ग्रेड वेतन - १३००/-									
	८	-	२ (१ माजी सैनिकासाठी, १ अपंगा-साठी) श्रवण शक्तीतील दोष)	१ (१ महिला-साठी	१ (१ महिला-साठी	१	१	-	१ (१ महिला-साठी	१ (१ माजी सैनिकांसाठी
	पहारेकरी / चौकीदार (वे.श्रे. रु.४४४०-७४४०) ग्रेड वेतन - १३००/-									
	१	१	-	-	-	-	-	-	-	-
	पाणक्या / जलवाहक (वे.श्रे. रु.४४४०-७४४०) ग्रेड वेतन - १३००/-									
	१	१	-	-	-	-	-	-	-	-
	सहाय्यक स्वयंपाकी (वे.श्रे. रु.४४४०-७४४०) ग्रेड वेतन - १३००/-									
	१	-	-	-	-	-	-	-	-	१
	भोजनालय सेवक (वे.श्रे. रु.४४४०-७४४०) ग्रेड वेतन - १३००/-									
	१	-	-	-	-	-	-	-	-	१

क्षणिक अर्हता व अनुभव :

क्र.	पदाचे नाव	शैक्षणिक अर्हता व अनुभव
१	सहाय्यक उपनियंत्रक (वे.श्रे.रु.१३००-३४८००) ग्रेड वेतन-४२००/-	१) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी (सायन्स, कॉमर्स किंवा आर्टस्). २) माध्यमिक शाळा अथवा कनिष्ठ महाविद्यालयात शिकविण्याचा एक वर्षाचा अनुभव.
२	तांत्रिक सहाय्यक श्रेणी-१ (ऑटोमोबाईल), (वे.श्रे.रु. १३००-३४८००) ग्रेड वेतन-४३००/-	१) शासनमान्य संस्थेचा ऑटोमोबाईल इंजिनीअरिंगचा डिप्लोमा. २) ऑटोमोबाईल वर्कशॉपचा १० वर्षांचा अनुभव.
३	उपनियंत्रण अधिकारी (गट - क) (वे.श्रे.रु.५२००-२०२००) ग्रेड वेतन - २८००/-	१) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी (सायन्स, कॉमर्स किंवा आर्टस्) २) रेडिओ टेलिफोन किंवा टेलिफोन बोर्डाचा प्रशिक्षण किंवा नागरी संरक्षण दळणवळण प्रगत पाठ्यक्रम पूर्ण.
४	मिश्रक / औषध निर्माता (वे.श्रे. रु.५२००-२०२००) ग्रेड वेतन - २८००/-	१) एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण २) संविधानिक विद्यापीठाचे औषध निर्माण शाखेची पदविका ३) मिश्रक पदावर १ वर्षाचा अनुभव
५	तांत्रिक सहाय्यक श्रेणी -२ (वायरलेस) (वे.श्रे.रु.५२००-२०२००) ग्रेड वेतन - २४००/-	१) शासनमान्य संस्थेचा रेडिओ इंजिनीयरिंगचा डिप्लोमा. २) वायरलेस वर्कशॉपचा ३ वर्षांचा अनुभव
६	रेडिओ विनतारी यांत्रिक (वे.श्रे.रु.५२००-२०२००) ग्रेड वेतन - २४००/-	१) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन्समधील डिप्लोमा. २) वायरलेस सेट दुरुस्तीचा तीन वर्षाचा अनुभव.
७	स्वयंचिजतंत्री (वे.श्रे. रु.५२००-२०२००) ग्रेड वेतन - २४००/-	१) एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण. २) शासनमान्य संस्थेचे आय.टी.आय. प्रमाणपत्र (स्वयं वीजतंत्री). ३) ऑटोमोबाईल वर्कशॉपमधील ३ वर्षांचा अनुभव.
८	दूरध्वनीचालक (वे.श्रे. रु.५२००-२०२००) ग्रेड वेतन - १९००/-	१) एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण. २) ईयीएबीएक्स बोर्ड चालविण्याचे ज्ञान आवश्यक. ३) शासनमान्य संस्थेचे दूरध्वनी चालकाचे प्रमाणपत्र.
९	सहाय्यक जोडारी यांत्रिक (वे.श्रे. रु.५२००-२०२००) ग्रेड वेतन - २०००/-	१) एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण. २) शासनमान्य संस्थेचे आय.टी.आय. प्रमाणपत्र (फिटर मॅकेनिक). ३) ऑटोमोबाईल वर्कशॉपमधील २ वर्षाचा अनुभव.
१०	वाहनचालक (वे.श्रे. रु.५२००-२०२००) ग्रेड वेतन - १९००/-	१) जड वाहन किंवा मोटार कार, जीप चालविण्याचा वैध परवानाधारक २) ७ वी पास ३) मराठी व हिंदी बोलता येणे आवश्यक ४) ३ वर्षे मोटार वाहन चालविण्याचा अनुभव (चारचाकी) ५) मोटार वाहन दुरुस्तीबाबत जुजबी ज्ञान व वाहन चालविण्याबाबत स्वच्छ रेकॉर्ड आवश्यक ६) सुदृढ शरीरयष्टी
११	अग्निशामक / विमोचक (वे.श्रे. रु.५२००-२०२००) ग्रेड वेतन - १९००/-	१) एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण. २) उंची - १६५ से.मी. ३) छाती - ८१ से.मी. व फुगवून ५ से.मी. अधिक. ४) वजन - ५० किलो. ५) दृष्टिदोष नसलेला.
१२	प्रथमोपचारक (वे.श्रे. रु.५२००-२०२००) ग्रेड वेतन - १९००/-	१) १० वी पास. २) सेंट जॉन ॲम्बुलन्सचे अथवा तत्सम संस्थेचे प्रथमोपचाराचे प्रमाणपत्र. ३) उंची १६५ से.मी. ४) छाती - ८१ से.मी. व फुगवून ५ से.मी. वाढ. ५) वजन - ५० किलो. ६) दृष्टी सर्वसाधारण (चष्म्याशिवाय).
१३	शिपाई / संदेशवाहक (वे.श्रे. रु.४४४०-७४४०) ग्रेड वेतन - १३००/-	१) शासनमान्य शाळेमधून चौथी परीक्षा उत्तीर्ण. २) सुदृढ शरीरयष्टी
१५	पाणक्या / जलवाहक (वे.श्रे. रु.४४४०-७४४०) ग्रेड वेतन - १३००/-	१) शासनमान्य शाळेमधून चौथी परीक्षा उत्तीर्ण २) सुदृढ शरीरयष्टी
१६	सहाय्यक स्वयंपाकी (वे.श्रे. रु.४४४०-७४४०) ग्रेड वेतन - १३००/-	
१७	भोजनालय सेवक (वे.श्रे. रु.४४४०-७४४०) ग्रेड वेतन - १३००/-	

नागरी संरक्षण संचालनालय अंतर्गत पदभरती २०११

सर्वसाधारण अटी

१) उपरोक्त अनु. क्र. १ ते १७ पदांच्या सरळ सेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून स्पर्धा परीक्षांसाठी (लेखी/व्यावसायिक/मौखिक) महाराष्ट्र [illegible] महामंडळ मर्यादित, पुणे, Maharashtra Knowledge Corpn Ltd (MKCL), Pune, यांच्यामार्फत अर्ज मागविण्यात येत आहेत. परीक्षे[illegible] विहित केलेला नमुना अर्ज महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL) संस्थेच्या संबंधित अधिकृत प्रशिक्षण केंद्रावर रु. २५/- (रु. पंचवीस फक्त) [illegible] भरल्यास उपलब्ध होईल. अधिक माहिती मिळण्याचे ठिकाण/संकेतस्थळ http://oasis.mkcl.org/cd ही वेबसाईट दि. १९.११.२०११ प[illegible] दि. ५.१२.२०११ पर्यंत खुली राहील.

२) उमेदवारांची माहिती संगणकावर एकत्रित करण्यात येणार आहे.

३) एम. के. सी. एल. या संस्थेच्या संबंधित अधिकृत केंद्रावी माहिती http://oasis.mkcl.org/cd या संकेतस्थळावर मिळेल. उमेदवाराचे M.K.C.L. च्या केंद्रावर कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० पासून सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत स्वीकारले जातील. एम. के. [illegible] एल.च्या अधिकृत प्रशिक्षण केंद्रामार्फतच भरलेले अर्ज स्वीकारले जातील. ज्या उमेदवारांनी या जाहिरातीपूर्वी नागरी संरक्षण संचालनालयाकडे वर [illegible] केलेल्या पदाकरिता नोकरीसाठी परस्पर अर्ज सादर केलेले आहेत ते अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, याची विशेष नोंद घ्यावी.

४) पदासाठी असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षेचा दिनांक, वेळ, परीक्षा [illegible] बैठक क्रमांक इ. बाबतची माहिती M.K.C.L. च्या संबंधित संकेतस्थळ (Website) वर उपलब्ध राहील. उमेदवारांनी ज्या केंद्रावर अर्ज सादर [illegible] आहे त्याच केंद्रावर परीक्षेसाठी पात्र असणाऱ्या उमेदवारांची परीक्षेची प्रवेशपत्रे उपलब्ध होतील. यासाठी उमेदवारांनी संबंधित केंद्राशी संपर्क साध[illegible] या संबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

५) रिक्त पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, प[illegible] संख्या, समांतर आरक्षण याबाबत बदल करणे, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशत: बदल करण्याबाबतचे सर्व अधिकार मा. संचालक, म[illegible] संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे स्वत:कडे राखून ठेवत आहेत. याबाबत उमेदवारास कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

६) प्रत्येक पदासमोर त्या पदासाठी असलेले समांतर आरक्षण दर्शविलेले आहे. दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाचे पात्र उमेदवार उपलब्ध न झाल[illegible] त्याच राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा नियमानुसार विचार केला जाईल.

७) सहाय्यक उपनियंत्रक व उपनियंत्रण अधिकारी (गट-क) या पदांच्या परीक्षा ऑनलाइन घेण्यात येतील. इतर पदांसाठी लेखी परीक्षा मुंबई या ठिक[illegible] आयोजित केली जाईल.

८) सदर भरतीच्या नियम/निकषांमध्ये भरती पूर्ण होईपर्यंत शासन अधिसूचना/निर्णय/परिपत्रकानुसार बदल होऊ शकतो.

९) जाहिरातीमधील भराव्याच्या पदांमध्ये वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे. उमेदवार एकापेक्षा अधिक पदांसाठी अर्ज करण्यास इच्छुक असल[illegible] त्यांनी प्रत्येक पदासाठी स्वतंत्रपणे अर्ज व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

१०) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु. २००/- (रु. दोनशे फक्त) व मागासवर्गीय उमेदवारांनी रु. १००/- (रु. शंभर फक्त) परीक्षा शुल्क अर्जासोबत स्वरूपात भरावयाचे आहे. सदर सेवाशुल्क हे ना परतावा राहील. कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही. परिपूर्ण अर्जासोबत परीक्षा [illegible] स्वीकारण्याची सोय एम. के. सी. एल.च्या अधिकृत प्रशिक्षण केंद्रावर करण्यात आलेली आहे. अर्ज परिपूर्ण असल्यास स्वीकारला जाईल व त्याबाब[illegible] पोच व उमेदवाराने भरलेल्या अर्जाचा गोषवारा तक्ता (Summary Sheet) सदर अधिकृत केंद्राकडून देण्यात येईल. **माजी सैनिकांना परीक्षा श[illegible] भरण्याची अटक लागू नाही.**

११) अनुक्रमांक १ ते ९, ११ व १२ या पदांसाठी D.O.E.A.C.C सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर [illegible] C स्तर यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-[illegible] परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र अर्जदाराकडे असावे. सदरचे प्रमाणपत्र नसल्यास नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत प्राप्त करणे अनि[illegible] राहील. अन्यथा उमेदवारास नेमणूक मिळाली तरी ती संपुष्टात आणली जाईल.

१२) **वयोमर्यादा :-** सर्व पदांसाठी वयाची अट जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकास किमान १८ वर्षे व कमाल ३३ वर्षे (मागासवर्गीयांसाठी ३८ व माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्तांसाठी ४ वर्षे तसेच पदवीधर/पदवीकाधारक अंशकालीन कर्मचाऱ्यांसाठी ४६ व[illegible] खेळाडूंसाठी विहित वयोमर्यादेपेक्षा ५ वर्षे अधिक) राहील.

१३) सहाय्यक उपनियंत्रक पदावर महाराष्ट्रात कोठेही नियुक्ती बदली करण्यात येईल. तसेच सहाय्यक उपनियंत्रक या पदावर नियुक्ती झालेल्या उमेदवा[illegible] रु. २०००/-चे हमीपत्र भरून देणे बंधनकारक आहे. त्याचा पहिल्या दोन वर्षांचा सेवा कालावधी परिवीक्षा कालावधी असेल व परिवीक्षा कालावधी त्याच पदावर दोन वर्षे शासकीय सेवा करणे बंधनकारक आहे.

१४) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी असलेले आरक्षण, शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. क्रिडो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, ३० एप्रिल २००५ मधील तरतुदीनुसार राहील. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्चवयोमर्यादे[illegible] वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. खुल्या प्रवर्गामधील अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी असलेले आरक्षण समाजातील उन्नत व प्रगत गटा[illegible] उमेदवारांना अनुज्ञेय नाही. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सद्य:स्थित वैध असलेले (नॉन-क्रिमिलेयर) प्रमा[illegible] जोडणे आवश्यक आहे. खेळाडू प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्य स्तरावरील (शासन निर्णय परिशिष्ट - अ मधील नमूद) खेळाचे व प्राधिकृत केलेल्या [illegible] अधिकाऱ्याचे असावे.

१५) **अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे**

१) अर्जावर विहित ठिकाणी पासपोर्ट साईज फोटो चिकटवून स्वाक्षरी करावी. तसेच शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, जातीचा दाखला तसेच आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. साक्षांकन हे केंद्र/राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्टमास्टर, मुख्याध्यापक याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिकाऱ्यांनीच केलेले असावे.

२) आरक्षित पदासाठी अर्ज केला असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र आणि उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र. मात्र आर[illegible] पदासाठी निवड झाल्यास जातवैधता प्रमाणपत्र विहित कालावधीत सादर केले नाही तर नेमणूक आदेश निर्गमित केले जाणार नाहीत.

३) विहित मर्यादेतील शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयप्रमुखांच्या पूर्वपरवानगीने भरावेत व अशा परवानगीची अर्जासोबत जोडावी. अशी प्रत जोडली नाही तर अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

४) महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग, इतर मागास यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि. २१ जानेवारी २० पासून अमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) प्रमाणपत्र त्रि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि[illegible] मागासप्रवर्ग व इतर मागासवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांची जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याने सन २०१०-२०१ (नॉन-क्रिमिलिअर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

५) महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक ८२/२००१/म.से.आ.२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक मे, २००१ आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

६) अंशकालीन कर्मचाऱ्यांनी/उमेदवारांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजना कार्यालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. संबंधित प्रमाणपत्राची छायांकित साक्षांकित करून अर्जासोबत जोडावी.

७) अर्जदार भारताचा नागरिक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. त्याला मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र राज्यातील रहि[illegible] असल्याबद्दल अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास उमेदवाराने त्याचा जन्म महाराष्ट्र राज्यात [illegible] असल्याचा दाखला (birth certificate) जोडावे.

८) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार/एकात्मिक आदिवासी प्रकल्प/जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात नावनोंदणी केली असल्यास त्याबाबत साक्षांकित अर्जासोबत जोडाव्यात.

९) अपंग/माजी सैनिक/प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त/पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी या प्रवर्गासाठी अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी त्या घ[illegible] सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला सादर करणे आवश्यक आहे. अपंग उमेदवाराच्याबाबत अपंगत्वाचे प्रमाण किमान ४०% असणे आवश्यक आहे.

१६) **इतर महत्त्वाच्या सूचना :-**

१) निवड झालेल्या उमेदवारांनी लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र भरून देणे बंधनकारक आहे. अविवाहित उमेदवारांनीसुद्धा "लागू नाही" असा शेरा नमूद व स्वत:ची स्वाक्षरी करावी.

२) अपंग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. तथापि त्यांनी तसे आयोगास स्वतंत्रपणे पत्राने कळविणे आवश्यक आहे.

३) उमेदवार ज्या राखीव जाती प्रवर्गाच्या पदासाठी अर्ज करीत असेल त्या जाती प्रवर्गाचे प्रमाणपत्र व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमा[illegible] अर्जासोबत जोडावे. अन्यथा उमेदवाराची अंतिमत: निवड झाल्यानंतर जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे जाती वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशि[illegible] उमेदवारास नियुक्ती दिली जाणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमानुसार सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन व भत्ते मिळ[illegible] तसेच नियुक्त होणाऱ्या उमेदवारास शासन निर्णय दि. १ नोव्हेंबर २००५ अनुसार लागू करण्यात आलेली अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू रा[illegible]

४) निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांची अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी [illegible] केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी/नियुक्ती रद्द करण्यात येईल.

५) एखाद्या अर्जदाराने एकापेक्षा जास्त पदांसाठी अर्ज सादर केल्यास व त्या पदांच्या लेखी परीक्षा एकाचवेळी आल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

६) उमेदवारास लेखी परीक्षा/शारीरिक चाचणी/व्यावसायिक चाचणी व मुलाखतीसाठी उपस्थित राहण्यासाठी स्वखर्चाने यावे लागेल. परीक्षा केवळ म[illegible] माध्यमातुनच घेतली जाईल.

७) पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुद्ध व पारदर्शक पद्धतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने उमेदवारांनी कोणत्याही प्रलोभनास बळी [illegible] नये.

८) रिक्त पदे शासनाच्या धोरणानुसार भरण्यात येत असून सदरहू जाहिरातीतील पदे भरण्यास तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास कार्यवाही स्थगित क[illegible] रद्द करण्याचे अधिकार नागरी संरक्षण संचालनालयाकडे राहतील.

९) लेखी परीक्षा/ व्यावसायिक चाचणी/ शारीरिक चाचणी व मुलाखती खालीलप्रमाणे गुणांच्या होतील. लेखी परीक्षा व व्यावसायिक चाचणी/शारी[illegible] चाचणी यांच्या एकत्रित गुणांच्या मेरीट लिस्टप्रमाणे व रिक्त पदांची संख्या विचारात घेता शासकीय नियमप्रमाणे गुणानुक्रमे आवश्यक तेव[illegible] उमेदवारांना मुलाखतीस बोलविण्यात येईल. लेखी परीक्षेत ४५% गुण मिळविलेल्या उमेदवारांना व्यावसायिक/शारीरिक चाचणीसाठी बोलाव[illegible] येईल.

१०) अनुभवाच्या बाबतीत तासिका, नियतकालिक, अर्धवेळ, विद्यावेतन, अभ्यागत अंशदानात्मक, विनावेतन, तत्त्वावर केलेल्या अंशकालीन से[illegible] कालावधी, तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराना कालावधी अनुभवासाठी ग्राह्य धरता येणार नाही.

११) उमेदवाराने एकापेक्षा जास्त पदांसाठी अर्ज सादर केल्यास व त्या पदांच्या लेखी परीक्षा एकाचवेळी आल्यास उमेदवार एकाच परीक्षेला बसू शकतो. [illegible] पदांच्या लेखी परीक्षेस न बसण्याबाबत वैयक्तिक जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील.

१२) परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१७) **लेखी परीक्षा, व्यावसायिक चाचणी/शारीरिक क्षमता चाचणी व तोंडी मुलाखतीचे गुण खालीलप्रमाणे असतील.**

अ. क्र.	पदांचे नाव	लेखी परीक्षा गुण	व्यावसायिक चाचणी गुण	शारीरिक क्षमता चाचणी गुण	तोंडी मुलाखत गुण	एकूण गुण
१	सहाय्यक उपनियंत्रक	१००	८०	--	२०	२००
२	तांत्रिक सहाय्यक श्रेणी-१(ऑटोमोबाईल)	१००	८०	--	२०	२००
३	उपनियंत्रण अधिकारी (गट-क)	२००	००	--	२५	२२५
४	मिश्रक/औषध निर्माता	२००	००	--	२५	२२५
५	तांत्रिक सहाय्यक श्रेणी -२ (वायरलेस)	१००	८०	--	२०	२००
६	रेडिओ विनतारी यांत्रिक	१००	८०	--	२०	२००
७	स्वयं विजतंत्री	१००	८०	--	२०	२००
८	दूरध्वनी चालक	१००	८०	--	२०	२००
९	सहाय्यक जोडारी यांत्रिक	१००	८०	--	२०	२००
१०	वाहनचालक	--	९०	--	१०	१००
११	अग्निशामक/विमोचक	१००	--	८०	२०	२००
१२	प्रथमोपचारक	१००	--	८०	२०	२००
१३	शिपाई/संदेशवाहक	९०	--	--	१०	१००
१४	पहारेकरी/चौकीदार	--	--	९०	१०	१००